स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/१० वी/खाजगी विद्यार्थी /स्वाध्याय पुस्तिका 1809
दिनांकः- ०६.१०.२०२३

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र ( इ.१० वी) परीक्षा खाजगी विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या स्वाध्याय पुस्तिका मंडळ संकेतस्थळावर पी.डी.एफ. (PDF) स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेबाबत.

संदर्भ :- १. क्र.रा.मं./परीक्षा-३/३४६७/दिनांक ०८.०८.२०२३ चे पत्र.
२. क्र.रा.मं./परीक्षा-३/४३७०/दिनांक ०४.१०.२०२३ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, आपणास सुचित करण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ.१० वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी थेट अर्ज योजना ही सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने सध्याची संपर्क केंद्रमार्फत नावनोंदणी करण्याची कार्यपध्दती बंद करुन खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज सर्व मान्यताप्राप्त शाळांकडून स्विकारण्याबाबतची कार्यपध्दती मार्च २०२४ च्या परीक्षेपासून निश्चित करण्य ात आलेली असून इ.१० वी खाजगी विद्यार्थ्यांसाठी लागणा-या स्वाध्याय पुस्तिका मार्च २०२४ परीक्षेपासून महाराष्ट्र र ाज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येतील असे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते.

या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा ( इंग्रजी /मराठी ) , गणित, समाजशास्त्र या विषयांच्या स्वाध्याय पुस्तिका ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या खाली दिलेल्या संकेतस्थळावर दिनांक ०४.१०.२०२३ पासून इंग्रजी, मराठी , हिंदी व उर्दू अशा चार माध्यमांमध्ये उपलब्ध करुन दिल्या जातील -

१ **http://form17.mh-ssc.ac.in**
२. **http://mahahsscboard.in**

| अ.क्र. | विषय | माध्यम |
|---|---|---|
| १ | मराठी ( द्वि/तृ ) | मराठी |
| २ | इंग्रजी (द्वि/तृ.) | इंग्रजी |
| ३ | गणित भाग १ व २ | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |
| ४ | इतिहास-राज्यशास्त्र | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |
| ५ | भूगोल | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |

तसेच विज्ञान विषयासाठी प्रात्यक्षिक परीक्षा असल्याने सदर विषयासाठी स्वाध्याय पुस्तिका राहणार नाहीत. सदर स्वाध्याय पुस्तिका विद्यार्थ्यांना फक्त सरावासाठी देण्यात येत आहेत. तसेच मान्यता प्राप्त शाळांनी खाजगी विद्यार्थ्यांची नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे तोंडी, अंतर्गत मुल्यमापन, प्रात्यक्षिक व श्रेणी विषयांची परीक्षा घेऊन सदर परीक्षांचे गुण विहित मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य आहे. तसेच नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचे सर्व रेकॉर्ड शाळेच्या दफ्तरी ठेवणेत यावे.तरी सर्व शाळांनी उपरोक्त संकेतस्थळावरुन स्वाध्याय पुस्तिका उपलब्ध करुन घ्याव्यात.

(डी.एस.पोवार )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

Form No-17 Paripatrak 2022-2023